**SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE**
Official Publication of Sant Gadge Baba Amravati University
PART – TWO

**गुरूवार, दिनांक २९ डिसेंबर, २०१६**

## अधिसुचना

क्रमांक : १२७/२०१६ दि. २९/१२/२०१६

**विषय – पर्यावरण पुरस्कार – २०१६**

सर्व सामान्यांच्या माहितीकरिता कळविण्यात येते की, पर्यावरण पुरस्कारासाठीची नियमावली नियम क्र. ३/२०१६ नुसार पर्यावरणासंबंधी विद्यापीठाला प्राप्त झालेल्या विविध पुरस्कारांच्या मुळ रकमेच्या व्याजातून विद्यापीठस्तरावर सुरु करण्यात आलेल्या '' **पर्यावरण पुरस्कार - २०१६** '' साठी **"गट - अ"** मधुन **स्व. भास्करराव शिंगणे कला, प्रा. नारायणराव गावंडे विज्ञान व आशालता गावंडे वाणिज्य महाविद्यालय, साखरखेर्डा ता. सिंदखेड राजा, जि. बुलढाणा** यांची पुरस्कार निवड समितीने निवड केली आहे. व **"गट - ब"** मधुन **एकही प्रस्ताव पात्र नसल्यामुळे** पुरस्कार निवड समितीने कोणाचीही निवड केली नाही. वृक्षारोपन, जलव्यवस्थापन, जलसंवर्धन, जनजागृती व प्रसार या बाबतची संबंधित महाविद्यालयाची माहिती पुढील प्रमाणे आहे.

**गट - अ**

दि. ०१/१२/२०१६ रोजी सकाळी - ११.०० वाजता समितीच्या सर्व सदस्यांनी प्रस्तावकर्त्याचे प्रक्षेत्राला भेट देवून संपुर्ण प्रक्षेत्राची पाहणी केली. समितीचे सर्व सन्माननीय सदस्यांनी प्रस्तावकर्त्या संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी यांच्याशी चर्चा करून त्यांनी पर्यावरणासंबंधी केलेल्या कार्याची व त्यासंबंधी भविष्यातील योजनाची माहिति घेण्यात आली. प्रस्तावकर्त्याने प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या वृक्षारोपनासंबंधीची तसेच पर्यावरणासंबंधीची दिलेली माहिती, प्रक्षेत्राची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आल्यानंतर त्या कामामध्ये सुसंगता दिसून आलेली आहे. सन २०११ ते २०१५ पर्यंत पुरस्कार प्राप्त महाविद्यालयाचे परिसरामध्ये व समोरील मुख्य रस्त्यावर, हिंदु स्मशान भुमी इत्यादि ठिकाणी विविध प्रजातीचे एकूण १००५ वृक्षांची लागवड केलेली असुन त्यामधुन जिवंत झाडे ८७१ आहे. पुरस्कार प्राप्त महाविद्यालयाने सौळद. वरोडी, पिंपळगांव सोनोरा, रताळी, साखरखेर्डा गावातील इत्यादि ठिकाणी वृक्षलागवडीचा कार्यक्रम ग्रामस्थ, शिक्षक, शिक्षीका, विद्यार्थी, विद्यार्थींनी, यांचे सहकार्याने राबविण्यात आलेले आहे. नागरिकांना वृक्षारोपनाचे महत्व तसेच वृक्षारोपण संगोपना संदर्भाची माहिती प्राध्यापक व तज्ञ व्यक्तिकडून दिलेली आहे. महाविद्यालयाने वनस्पतींची निगा राखण्याकरिता व पाण्याची कमतरते मुळे ठिबक सिंचन तंत्राचा केलेला आहे. तसेच तांत्रिक व्यक्ति कडून झाडांचे संगोपन व संवर्धन करण्याकरिता झाडांना उखरी देणे, फवारणी करणे, आवश्यक ठिकाणी शेडनेटचा उपयोग करणे, झाडांची व्यवस्थीत कटींग करणे इत्यादि तंत्राचा वापर केलेला आहे. पुरस्कार प्राप्त महाविद्यालयाने महाविद्यालयाच्या परिसरामध्ये जी झाडे लावलेली आहे त्यापैकी बहुतेक झाडांना स्थानिक नावासह शास्त्रीय नावाची फलके लावलेली आहे. पुरस्कार प्राप्त महाविद्यालयाने परिसरामध्ये लावलेले विविध प्रकारच्या वृक्षारोपनाच्या मध्यभागी पाण्याचे लहान - लहान टाके करुन पक्ष्यांकरिता पिण्याचे पाण्याची व्यवस्था तसेच त्यांना खाण्याकरिता वेगवेगळ्या प्रकारचे धान्याची व्यवस्था महाविद्यालयात केलेली असल्यामुळे बऱ्याच प्रकारचे पक्षी परिसरात येण्याचे प्रमाण वाढलेले आहे. यामाध्यमातुन महाविद्यालयाने जैवविविधतेचे संगोपन केलेले आहे. पुरस्कार प्राप्त महाविद्यालयाने महाविद्यालयात पाण्याचे टाके, पानवटे तयार करणे, विविध ठिकाणी पक्ष्यांना बसण्याकरिता विविध प्रकारच्या फळ, फुले व इतर प्रकारच्या झाडांची लागवड केलेली आहे. याबाबतचे महाविद्यालयाने जैवविविधतेचे संवर्धनाकरिता उपाययोजना केलेल्या आहे. महाविद्यालयाने रोपवाटीका तयार केलेली आहे. रोपवाटीकेमध्ये विविध प्रकारची अनेक रोपे तयार करण्यात येतात तसेच काही रोपे वेगवेगळ्या रोपवाटीकेतुन खरेदी करुन त्यांचे संगोपन करण्यात येते. तयार झालेली रोपे दरवर्षी महाविद्यालयाचे परिसरात लावण्यात येते. महाविद्यालयाने वृक्षलागवड व वृक्षसंवर्धनाच्या दृष्टिने ग्रामीण भागात व विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती व्हावी व त्यांनी या चळवळीत सक्रिय सहभाग घ्यावा. या हेतुने विविध कार्यक्रमामध्ये पिण्याच्या पाण्याकरिता जे प्लॉस्टीक ग्लास वापरल्या जातात त्या ग्लासचा उपयोग करुन त्यामध्ये माती व खत भरुन स्थानिक बियाचे संकलन करुन त्या ग्लासमध्ये लावल्यास आपल्या घराच्या आवारात विविध प्रकारची झाडे तयार करुन रोपवाटीका तयार केलेली आहे. सदर रोपे प्रत्येक पावसाळ्यात वृक्षलागवडी करिता उपयोगात आणण्यात येत आहे. पुरस्कार प्राप्त महाविद्यालयाने जलव्यवस्थापनाचे कार्यामध्ये रेन वॉटर हार्वेस्टींग करुन परिसरामध्ये 100x30x15 फुट क्षेत्रफळ असलेल्या तळाची निर्मिती करुन त्यामध्ये परिसरातील संपुर्ण पाणी एकत्रित ठिकाणी गोळा करुन "पाणी अडवा व पाणी जिरवा" प्रकल्प राबविला आहे. पुरस्कार प्राप्त महाविद्यालयाने इमारतीच्या छतावरिल (Roof Water Harvesting) व्दारे महाविद्यालयाचे परिसरामध्येच जलसंवर्धनाचे कार्य केलेले आहे. त्या पाण्याचा उपयोग परिसरातील वृक्षारोपनाकरिता व जलपुर्नभरणाच्या कामाकरिता करण्यात येत असल्याचे समितीला

दिसून आले. पुरस्कार प्राप्त महाविद्यालयाने चिखली ते लव्हाळा या रस्त्याचे दरम्यान लिकेज व्हालवर सिमेंटचे ५२ नग टाके बसवून पाण्याचा होणारा अपव्यय थांबविला. सदर पाण्याचा उपयोग त्या रस्त्यानी ये-जा करण्यारे गुरे, ढोरे, पशुपक्षी व नागरिक सुध्दा करतात, अश्या प्रकारची प्रत्यक्ष कार्य करुन जलसंवर्धनाची जनजागृती केल्याचे समितीला दिसून आले. "पाणी अडवा पाणी जिरवा" ही शासनाची योजना विद्यार्थी, शिक्षक, महाविद्यालयीन कर्मचारी, ग्रामीण भागातील लोकसहभागातून सौळद, वरोडी, पिंपळगांव सोनोरा व साखरखेर्डा इत्यादि ठिकाणी विविध प्रकारचे बंधारे बांधून व शासकीय यंत्रणेची तांत्रिक मदत घेवून शासकीय योजना अमलात आणलेली आहे. महाविद्यालयाचे विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारी हे दत्तकग्राम वरोडी येथील यात्रा संपन्न झाल्यानंतर त्या परिसरात प्लॉस्टीक व इतर कचऱ्यामुळे होणारे प्रदुषण रोखण्याकरिता संपुर्ण परिसर स्वच्छ करुन ग्रामस्थान करिता एक वेगळा पायंडा पाडल्याचे दिसून आले. सदर अभियान मागिल वर्षी दि. १७/१२/२०१५ रोजी राबविलेले आहे. महाविद्यालयाने महाविद्यालयाचे परिसरात सौर उर्जेवर चालणारे दिवे लावून प्रत्यक्ष कार्य केलेले आहे. महाविद्यालयाने ०५ जुन या जागतिक पर्यावरण दिवसाचे महत्व लक्षात घेवून महाविद्यालयामध्ये वृक्षारोपन करुन महाविद्यालयाच्या स्तरावर कार्यक्रमाचे आयोजन करुन या दिवसाचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. तसेच पर्यावरण सहल चिखलदरा येथे काढण्यात आलेली होती. महाविद्यालयाव्दारे पर्यावरण संवर्धनाकरिता वृक्षारोपन, वृक्षसंवर्धन, सौर उर्जा निर्मिती, जलव्यवस्थापन व जलसंवर्धन, पक्षी संवर्धन, स्वच्छता अभियान, पाण्याचा अपव्यय टाळण्याकरिता उपाययोजना इत्यादि प्रकारचे उपक्रम राबविलेले आहे. पुरस्कार प्राप्त महाविद्यालयाने शासनाचे ०२ कोटी वृक्ष लागवडी अंतर्गत महाविद्यालयाचे परिसरात झाडे लावण्याचे उपक्रमात सहभाग घेतलेला आहे. पुरस्कार प्राप्त महाविद्यालयाने रक्तदान शिबिराचे आयोजन करुन महाविद्यालयीन स्तरावर रक्त संकलन करुन शासकीय व खाजगी रक्तपेढीला पुरवठा केलेला आहे. **पुरस्कार प्राप्त महाविद्यालयाला यापुर्वी सन २०१२ चा छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार प्राप्त झालेला आहे. पुरस्कार प्राप्त महाविद्यालयाला सन २०१५ – १६ चा संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या "राष्ट्रीय सेवा योजनेचा" "स्वच्छ भारत अभियान" पुरस्कार प्राप्त झालेला आहे.** समितीला प्रत्यक्ष प्रक्षेत्रीय पाहणी दरम्यान असे निदर्शनास आले की, महाविद्यालयाच्या परिसरात जी जमिन उपलब्ध आहे ती Non-fertile आहे, परिसरात अत्यंत टणक मुरुम असुन त्याठिकाणी पाण्याची अत्यंत कमतरता आहे. अशा अत्यंत कठिण परिस्थितीत (Adverse condition) मध्ये महाविद्यालयाव्दारे राबविण्यात आलेले वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन, जलव्यवस्थापन, जलसंवर्धन इत्यादि कार्य हे उल्लेखनीय आहेत. महाविद्यालयाने पर्यावरण संवर्धनामध्ये समाविष्ठ असणा-या बाबींपैकी वृक्षारोपन, वृक्षसंवर्धन, जलव्यवस्थापन, जलसंवर्धन व जनजागृती इत्यादी कार्यामध्ये भरीव कामगिरी केलेली आहे. महाविद्यालयाने राबविलेल्या पर्यावरणा संबंधीच्या विविध उपक्रमामुळे पर्यावरण संतुलन राखण्यास मदत झालेली आहे.

वरिल संपूर्ण बाबी लक्षात घेता, प्रस्तावकर्त्या महाविद्यालयाने केलेले कार्य पर्यावरणाचे दृष्टीने उत्कृष्ठ असल्यामुळे **स्व. भास्करराव शिंगणे कला, प्रा. नारायणराव गावंडे विज्ञान व आशालता गावंडे वाणिज्य महाविद्यालय, साखरखेर्डा ता. सिंदखेड राजा, जि. बुलढाणा** यांना '' **गट - अ** '' मधुन विद्यापीठाचा '' **पर्यावरण पुरस्कार - २०१६** '' घोषित करण्यात आला आहे.

स्वा/-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*****

## NOTIFICATION

No. : 128/ 2016 Date: 29/12/2016

**Subject : Cessation of Membership of Dr. Smita Yashwant Gawai on the Board of Studies in Education**

Ref'nce : Notification No. 139/2012 dt. 26.9.2012

It is notified for general information of all concerned that, membership of Dr. Smita Yashwant Gawai, Hanuman Vyayam Krida Mandal College of Education, Yavatmal on the Board of Studies in Education in the Faculty of Education under provision of clause (b) of sub-section (2) of section 37 of the Maharashtra Universities Act, 1994 has been ceased in accordance with the provision of section 43 of the above mentioned Act as she has been relieved since Academic session 2014-2015 from above mentioned college.

By virtue of her membership on the Board of Studies, membership acquired by her on the other authorities/bodies of the University shall also stand ceased.

Sd/-
Registrar
Sant Gadge Baba Amravati University

*****